स न १९२६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय २-प्रवास
सं. नं. 22.

# कराची जिल्ह्याचें भूवर्णन.

लेखक

आत्माराम दत्तात्रय कुलकर्णी

शिक्षक मराठी स्कूल, कराची

REFBK-0003235
REFBK-0003235

सन १९२६

# कराची जिल्ह्याचें भूवर्णन.

लेखक

आत्माराम दत्तात्रय कुलकर्णी

शिक्षक मराठी स्कूल, कराची

REFBK-0003235

सन १९२६

किंमत पांच आणे.

मुद्रकः— गणेश काशिनाथ गोखले सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५–९६ शनवार पेठ, पुणें.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

प्रकाशकः—आत्माराम दत्तात्रय कुलकर्णी,
शिक्षक मराठी स्कूल, कराची.

सं. न. २९

# प्रस्तावना

हल्लींच्या शिक्षणक्रमांत हळूहळू भूगोल हा विषय प्रामुख्यानें पुढें येऊं लागून त्याची महती बऱ्याच जणांना कळूं लागली आहे. विद्यार्थ्यांना हा विषय उत्तम तऱ्हेनें कळावा याबद्दल नानाविध प्रयत्न चालू आहेत. अशा वेळीं अभ्यासक्रमास प्राथमिक शाळांमधून विशेषतः कराची येथें असणाऱ्या मराठी वर्गाच्या मुलांसाठीं लागणाऱ्या पुस्तकाची फारच उणीव होती. कराची जिल्ह्याचा अगर तालुक्याचा अथवा सिंधप्रांताचा भूगोल मराठी मुलांकरितां अत्यंस आवश्य असाच आहे. ही उणीव कराची जिल्ह्याचें भूवर्णन तयार करून रा. कुलकर्णी यांनीं भरून काढली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रा. कुलकर्णी यांचा हा जरी प्रथम प्रयत्न आहे तथापि लहान मुलांना ह्या पुस्तकापासून कराची जिल्ह्याबद्दलची चांगली माहिती होईल यांत बिलकूल शंका नाहीं. हें पुस्तक म्हणजे विद्यार्थ्यांच्या सोईकरितां शिक्षक या नात्यानें त्यांनीं जीं टांचणें वेळोवेळीं तयार केलीं तींच टांचणें व्यवस्थित ग्रंथांत करून विद्यार्थिवर्गास पुस्तकरूपानें दिलीं जात आहेत.

पुस्तकामध्यें नकाशाचा उपयोग कसा करावा, मुलांना विषयाची माहिती मनोरंजक करून कशी सांगतां येईल याबद्दल जी माहिती आहे ती अवश्य उपयोगांत आणावी. शिवाय राज्यव्यवस्थेबद्दलही लहान मुलांना माहिती असणें अवश्य आहेच व तोही भाग पुस्तकास जोडला आहे. पुस्तकाचे शेवटीं भूवर्णनावर प्रश्नसमुदाय जोडून विद्यार्थ्यांना एक दिशा दाखवून दिलेली आहे. अशा

रीतीनें हें लहानसें पुस्तक लहान मुलांना कराची जिल्ह्याचें वर्णन पूर्णपणें अवगत करील असेंच आमचें मत आहे.

याशिवाय विषयाची मांडणी शाळांतून चालणाऱ्या क्रमिक अभ्यासास अनुसरूनच केलेली असल्यामुळें हें छोटेसें पुस्तक प्राथमिक शाळांमध्यें क्रमिक पुस्तक म्हणून नेमलें जावें असा रा. कुलकर्णी यांचा जो हेतू तोही तडीस जाण्यास कोणतीच हरकत नाहीं.

कराची.
ता. १७ माहे मे
सन १९२६.

*(Sd.)* रामचंद्र दामोदर करमरकर.
बी. ए.

# अनुक्रमणिका


| भाग पहिला | पृष्ठ |
|---|---|
| उपोद्घात | १ |
| नकाशासंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती | ५ |
| अंतरप्रमाण अथवा स्केल | ६ |
| **भाग दुसरा** | |
| कराची जिल्ह्याचें सामान्य वर्णन | ७ |
| कराची तालुका | ९ |
| ठठ्ठा तालुका | ११ |
| मिरपूरसाक्रा तालुका | १२ |
| घोडाबारी तालुका | १३ |
| केटी बंदर महाल | १३ |
| कोट्री तालुका | १४ |
| माझांद महाल | १५ |
| कोहिस्तान महाल | १५ |
| मिरपूरभटोरा तालुका | १६ |
| सुजावल तालुका | १७ |
| जाती तालुका | १७ |
| शहाबंदर तालुका | १८ |
| **भाग तिसरा** | |
| जिल्ह्याची राज्यव्यवस्था | १९ |
| भूगोल विषयक उपयुक्त व्याख्या | २० |
| प्रश्नसमुदाय | २२ |


जिल्हा कराची
लारखाना जिल्हा
कोहिस्तान महाल
कोटी तालुका
कराची तालुका
ठठा तालुका
मिरपूर साका तालुका
घोडाबारी तालुका
शहाबंदर तालुका
हैदराबाद जिल्हा
जाती तालुका
अरबी समुद्र
कराची

3235

# भाग पहिला

## उपोद्घात

आपल्या प्राथमिक शाळांतील दुसरी इयत्ता ही भूगोलवर्णनाची पहिलीच व अगदीं लहान अशी पायरी चढलेली असते. तेव्हां तेथें त्यांना या विषयाचें किती ज्ञान झालें आहे हें पाहूनच शिक्षकांस पुढच्या अभ्यासक्रमास सुरुवात करावी लागते.

या वर्गांत ( तिसऱ्या इयत्तेंत ) येणारीं मुलें बहुधा अल्पवयीच असतात. व भूगोल हा विषय फक्त पुस्तकावरून पाठ करूनच पूर्ण अवगत होणारा नसल्यामुळें त्यांना तो बराच अवघड वाटतो. भूगोल फक्त पुस्तकावरून पाठ करण्यास, अवश्य त्या साधनांच्या साह्यानें तो शिकण्यापेक्षां जास्त त्रास होतो व त्याबद्दलची बरोबर कल्पना मनामध्यें बिंबली जात नाहीं. यामुळें तें पुस्तकी ज्ञान होतें. त्याचा व्यवहारांत विशेष उपयोग होत नाहीं. याकरितां जेणेंकरून आपण दिलेल्या माहितीचा ठसा मुलांच्या मनावर बरोबर उमटेल अशा साधनांच्या साह्यानेंच ( शक्य तितका ) भूगोल शिकविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आतां या कामीं अल्पांशानें तरी मदत व्हावी या उद्देशानें मी थोडासा प्रयत्न करीत आहें. त्याचा उपयोग माझ्या व्यवसायबंधूंना भूगोल अध्यापनाचे कामीं होईल अशी मला पूर्ण आशा आहे.

**सहल करितांना देण्यासारखी माहिती:—** मुलांस दिशांची माहिती शाळेंत ( शाळेच्या इमारतींत ) दिली असल्यामुळें एखाद्या

परक्या ठिकाणीं त्यांना एकदम बरोबर दिशा ओळखणें कठीण पडतें. याकरितां सकाळीं किंवा संध्याकाळीं सहल करावयास जाऊन प्रत्यक्ष सूर्याच्या उदयास्तावरून दिशांची माहिती दिली असतां तिचा मुलांना व्यवहारांत जास्त उपयोग होईल. गांवाशेजारच्या एकाद्या टेकडीवर जाऊन तेथून गांवचा देखावा दाखविला असतां गांवाच्या आकाराबद्दल व विस्ताराबद्दल मुलांना बरोबर कल्पना करितां येईल. तसेंच टेकडी, डोंगर व पर्वत यांचीही बरीच माहिती होईल. एकादेवेळीं नदीच्या कांठीं अगर नदी नसल्यास पाण्याचा सांठा असेल अशा ठिकाणीं जाऊन बेट, तळें, भूशिर, आखात वगैरेबद्दल मुलांना माहिती सांगून त्याप्रमाणें त्यांच्याकडून पाण्याच्या साह्यानें प्रत्यक्ष आकृती करवून घ्याव्या. उदा० मध्यें थोडीशी उंच जागा ठेवून भोंवतीं पाणी राहील अशा रितीनें जमीन खणावी व तींत पाणी सोडावें. नंतर हें काय तयार झालें असा मुलांस प्रश्न विचारावा. असें केल्यानें त्यांना बेटाबद्दल बरोबर कल्पना येऊन ती व्याख्या त्यांच्या सहज ध्यानांत राहील. गांवाच्या बाहेर निरनिराळ्या दिशांकडे फिरावयास गेलें असतां मुलांस त्या गांवच्या सीमांबद्दल माहिती सांगावी. सीमा व दिशा समजल्यावर कोणतेंही ठिकाण कसें बरोबर शोधून काढतां येतें हें सांगून सीमा व दिशा यांचा उपयोग सांगावा. या योगानें मुलांना तालुका, जिल्हा वगैरेंच्या सीमांबद्दल बरोबर कल्पना करितां येईल.

**प्रदेशाचें स्वरूप, नद्या व पाऊस:**—उंच सखल प्रदेशांबद्दल माहिती देतांना नकाशावरून डोंगराळ प्रदेश मुलांना दाखवावा व पाण्याचा धर्म उंच जागेकडून सखल जागेकडे वाहाण्याचा आहे, याची त्यांना आठवण देऊन त्या प्रदेशांतील नद्या कोणत्या दिशे-कडून कोणत्या दिशेकडे वाहात जातात हें नकाशावरून दाखवावें.

असें केल्यानें उंच प्रदेश कोणता व तो कोणत्या दिशेकडे सखल होत गेला आहे. हें मुलांना सहज व बरोबर समजेल.

डोंगराळ प्रदेशांत पाऊस जास्त पडतो व डोंगर अगदीं नसलेल्या प्रदेशांत पाऊस कमी पडतो हें मुलांना सांगावें ( कारणें सांगितलीं नाहींत तरी चालेल. ) म्हणजे पाऊस कोठें किती पडत असावा याबद्दल नकाशा पाहून मुलांना साधारण कल्पना करितां येईल.

**लोकवस्ती व पिकें:**—सुपीक व नापीक प्रदेशासंबंधीं नकाशावरून माहिती देऊन, सुपीक प्रदेशांतच लोकवस्ती कां दाट असते हें सांगावें. तसेंच लोकांचे रीत रिवाज, भाषा व उद्योग याबद्दलही याचवेळीं माहिती सांगावी.

पिकें मुख्यतः तीन साधनांनीं येतात; १ वेळच्यावेळीं पडणाऱ्या पावसानें, २ विहिरींच्या पाण्यानें व ३ कालव्यांच्या पाण्यानें. आतां कमी पाण्यानें येणारीं पिकें कोणतीं व जास्त पाण्यानें येणारीं पिकें कोणतीं, हें प्रथम सांगून नंतर कोणत्या भागांत कोणतीं पिकें येतात व तीं कां हें मुलांना सांगावें.

**आयात व निर्यात माल:**—याचा व पिकांचा आणि उद्योग धंद्यांचा कसा निकट संबंध आहे हें बरोबर समजलें असतां आयात व निर्यात माल ध्यानांत ठेवणें फार सोपें पडेल. जिल्ह्यांत जें पीक विशेष होतें किंवा जो पदार्थ जास्त तयार होतो, तो पदार्थ किंवा तें पीक त्या जिल्ह्याच्या निर्यात मालांत असणारच. तसेंच जिल्ह्यांत जें पीक किंवा जो पदार्थ तयार होत नाहीं, व ज्यांची तेथील लोकांना जरुरी आहे, असे पदार्थ नेहमीं आयात मालांत असतात. उदा० साखर, राकेल, कापड वगैरे पदार्थ बहुतेक जिल्ह्यांच्या आयात मालांत असतातच.

येथपर्यंत भूगोल शिकवितांना कांहीं बाबी संबंधानें कसा खुलासा करावा याचें थोडक्यांत विवेचन केलें. हें माझें पहिलेंच काम असल्यामुळें चुका होण्याचा बराच संभव आहे. याकरितां सर्व शिक्षक बंधूंस माझी नम्र विनंति आहे कीं, यांमध्यें कांहीं चुका आढळल्यास किंवा कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या त्यांनीं कृपा करून मला कळवाव्या, म्हणजे ईश्वर कृपेनें दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग प्राप्त झाल्यास त्यांत त्यांचा जरूर समावेश करण्यांत येईल.

रा. द. वा. शुक्ल ड्राइंग मास्तर यांनीं नकाशा तयार करण्याच्या बाबतींत बरीच मदत केली व रा. रा. रामचंद्र दामोदर करमरकर बी. ए. यांनीं हें पुस्तक तपासून त्यावरील आपला अभिप्राय व्यक्त केला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून हा उपोद्‌घात संपवितों.

आपला,

**आत्माराम दत्तात्रय कुलकर्णी.**

# नकाशासंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती.

मुलांनो नकाशाबद्दल थोडीशी माहिती तुम्हांस दुसऱ्या इयत्तेंत मिळाली आहे. आतां नकाशा पाहून त्यावरून कशी माहिती मिळवावी हें मात्र अद्याप तुम्हांला बरोबर समजत नाहीं. तें समजण्याकरितां नकाशासंबंधाच्या ज्या कांहीं ठराविक खुणा आहेत त्या समजल्या पाहिजेत. याकरितां खालीं अशाच कांहीं खुणांची माहिती दिली आहे. नदी—उगमाजवळ नदी अगदीं लहान असते व पुढें ज्या प्रमाणांत तिला नद्या, ओढे वगैरे मिळत जातील त्या प्रमाणांत ती मोठी मोठी होत जाते. तसेंच ती सरळ न जातां जिकडे उतरता प्रदेश असेल तिकडे वळणें घेत घेत जाते. व शेवटीं समुद्रास किंवा दुसऱ्या नदीस मिळते. त्याप्रमाणेंच नकाशावर उगमाजवळ एक बारीक रेघ काढण्यास सुरुवात करून ती क्रमानें मोठी करीत करीत व त्या नदीप्रमाणेंच तिला वळणें देत देत तिच्या मुखापर्यंत नेलेली असते. (नकाशावरील नद्या पहा.) नदी नकाशावर साधारण निळसर रंगानें दाखविलेली असते.

डोंगर व पर्वत हे नकाशावर अगदीं दाट व बारीक बारीक ठिपके देऊन दाखवितात.

सरोवर किंवा पाण्याचा सांठा असल्यास तो नकाशावर निळसर रंगानें दाखवितात. कारण लांब अंतरावरून पाण्याचा रंग निळसर दिसतो.

बैलगाडीची सडक नकाशावर दाखवावयाची असल्यास जोडीनें दोन रेषा काढून दाखवितात. ज्याप्रमाणें ती सडक सरळ किंवा वाकडी असेल त्याप्रमाणेंच नकाशावरील रेघाही काढलेल्या असतात. जसें

आगगाडीचा रस्ता नकाशावर एकच लांब रेघ (तो रस्ता असेल त्याप्रमाणें सरळ किंवा वांकडी) काढून तिच्यावर बारीक बारीक आडव्या रेघा काढून दाखविलेला असतो. जसें +++++

## अंतरप्रमाण अथवा स्केल.

एकाद्या स्थळाचा नकाशा काढावयाचा असेल तर त्या स्थळा-एवढा कागद मिळणें बहुतेक शक्य नसते. याकरितां नकाशा काढतांना ज्या प्रदेशाचा नकाशा काढावयाचा असेल त्याच्या अमुक लांबीबद्दल नकाशावर अमुक लांब रेघ काढावयाची असें कांहीं तरी प्रमाण ठरवावें लागतें. त्यासच अंतरप्रमाण अथवा स्केल म्हणतात. हें अंतरप्रमाण प्रत्येक नकाशावर लिहिलेलें असतें.

**उपयोग**—एक स्थळ दुसऱ्या स्थळापासून किती दूर आहे हें पहावयाचें असल्यास नकाशावर त्या दोन स्थळांमध्यें किती अंतर आहे हें फूटपट्टीनें किंवा दोऱ्यानें मोजून ती लांबी किती इंच आहे हें पाहावें. नंतर त्या नकाशाचें दर इंचास जें स्केल असेल त्यानें त्या लांबीस गुणावें; ह्मणजे त्या दोन स्थळांमधील अंतर किती मैल आहे हें समजेल. उदा० कराची व ठट्टा यांच्या मध्यें नकाशावर साडेचार इंच अंतर आहे व त्या नकाशाचें स्केल दर इंचास १५मैल आहे. म्हणून कराचीपासून ठट्टा (१५ × ४॥) = ६७॥ मैल दूर आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

# भाग दुसरा.

## कराची जिल्ह्याचें सामान्यवर्णन.

**सीमा**–उत्तरेस लारखाना जिल्हा, पूर्वेस सिंधूनदी; हैद्राबाद जिल्हा, दक्षिणेस अरबी समुद्र आणि पश्चिमेस हालापर्वत व बलुचिस्तान.

हा जिल्हा सिंधप्रांताच्या नैर्ऋत्य भागीं आहे. याची लांबी दक्षिणोत्तर लारखाना जिल्ह्यापासून अरबी समुद्रापर्यंत आणि रुंदी पूर्वपश्चिम हालापर्वतापासून सिंधूनदीपर्यंत आहे.

**क्षेत्रफळ**––११७८२ चौरस मैल.

**लोकसंख्या**––५४२०६५

**प्रदेशाच्या स्वरूपाचें वर्णन**––ह्या जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भाग विशेषतः कोहिस्तान महाल डोंगराळ असल्यामुळें फारसा सुपीक नाहीं. सिंधूनदीच्या कांठचा प्रदेश चांगला सुपीक आहे, परंतु सिंधूनदीच्या पूर्वेकडील कांठचा कांहीं भाग फार दलदलीचा असल्यामुळें तो सुपीक नाहीं आणि तेथील हवाही चांगली नसते. या जिल्ह्यांतील बहुतेक नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे व नैर्ऋत्येकडे वाहात गेलेल्या आहेत. त्यावरून हा जिल्हा त्या दिशांकडे उतरता असावा.

**पाऊस**––कोहिस्तान महालांत पाऊस सिंधच्या व कराची जिल्ह्याच्या मानानें बराच पडतो. एकंदरीनें पाहूं गेलें असतां या जिल्ह्यांत पाऊस फार थोडा पडतो. पाऊस कमी पडत असल्यामुळें

शेती बहुतके सिंधूनदीच्या कालव्यांच्या पाण्यावर होते. सिंधूनदीचे कालवेही या जिल्ह्यांत बरेच आहेत.

**पिकें**—भात, ज्वारी, बाजरी व गहूं हीं मुख्य पिकें होत. यांशिवाय जांबा, कडधान्यें, गळिताचीं धान्यें यांचेंही पीक होतें.

**नद्या**—सिंधू, हब, मलीर, बारन व लियारी या होत. सर्वांत मोठी नदी सिंधू होय.

**कालवे**—या जिल्ह्यांतील बहुतेक शेती कालव्यांच्या पाण्यावर अवलंबून आहे, शिवाय सिंधूनदीसारखी मोठी व कालवें काढण्यास योग्य अशी नदीही या जिल्ह्यांत असल्यामुळें कालवे पुष्कळच काढलेले आहेत, तेः—

भगार, कहरी, नशीरवाह, ओछतो, हेदरी, सियाण, कलंदरी, सदाब्रहार, बगदाद, सापावाह, पिंजारी, गंजबख्खर, फत्तेवाह, महंमुदोवाह, गुंगडो, गदाप, शेरखान, सिंध, कोरी, मल्ह, मुटनी वगैरे.

**हवा**—या जिल्ह्यास समुद्र जवळ असल्यामुळें अतिशय उष्णता व अति थंडी हीं नसतात. त्यामुळें या जिल्ह्याची हवा मध्यम प्रतीची आहे.

**व्यापाराचे मार्ग**--या जिल्ह्यांतील कराची, ठठ्ठा, कोट्री, माझांद या तालुक्यांतून आगगाडीचा रस्ता गेलेला असल्यामुळें तेथील मालाची ने--आण आगगाडीनेंच होतें. परंतु इतर ठिकाणीं उंटाच्या साह्यानें व्यवहार चालतो. सिंधू नदींतून व अरबी समुद्रालगत असलेल्या ठिकाणांतून गलबतांनीं व्यापार चालतो.

**कारागिरीचे जिन्नस**—रेशमी लुंग्या, रेशमी कापड, रंगीत चादरी, रझया, लांकडाचें कांतीव सामान आणि रंगाचें काम याबद्दल ठठ्ठा शहर फार प्रसिद्ध आहे.

**भाषा**—या जिल्ह्यांतील मुख्य भाषा सिंधी होय. परंतु कराची

ठ्ठा वगैरेसारख्या मोठ्या शहरांतून गुजराथी, हिंदी वगैरे भाषाही चालतात.

**आयात माल**—कापड, सोनें, रुपें, कांचेचें सामान, साखर, राकेल, हस्तिदंत, रेशीम, मोत्यें, दारू, स्टेशनरी सामान वगैरे जिन्नस बाहेरून या जिल्ह्यांत येतात.

**निर्यात माल**—तांबडे तांदूळ, बाजरी, तूप, कडधान्यें, गळिताचीं धान्यें, जळाऊ लाकडें, कोळसा, रेशमी लुंग्या, रंगीत चादरी वगैरे माल या जिल्ह्यांतून बाहेर जातो.

**राज्यव्यवस्था**—सरकारनें सोयीसाठीं या जिल्ह्याचें तीन भाग केले आहेत. त्या प्रत्येक भागाला सब्डिव्हिजन म्हणतात. तेः–(१) ठ्ठा, (२) कोट्री, (३) शहाबंदर.

**ठ्ठा सब्डिव्हिजनमधील तालुकेः**—कराची, ठ्ठा, मिरपूरसाक्रा, घोडाबारी, केटीबंदरमहाल.

**कोट्री सब्डिव्हिजनमधील तालुके**—कोट्री, माझांद आणि कोहिस्तान महाल.

**शहाबंदर सबडिव्हिजनमधील तालुके**--मिरपूरभटोरा, सुजावल जाती आणि शहाबंदर.

---

## कराची तालुका.

**सीमा**—उत्तरेस कोहिस्तान महाल, पूर्वेस ठ्ठा तालुका, दक्षिणेस मिरपूरसाक्रा तालुका, अरबी समुद्र. आणि पश्चिमेस हब नदी मौंझ भूशीर.

**नद्या**—मलीर, हब, लियारी, बाजार व सकन या नद्या या तालुक्यांत आहेत.

लोकसंख्या—२४४१६२.

या तालुक्याच्या दाक्षिण भागांतून आगगाडीचा रस्ता गेलेला आहे. त्या रस्त्यावर नऊ स्टेशनें आहेत तीं:—केमारी, कराची-सिटि, कॅन्टोन्मेन्ट, ड्रिगरोड मलीर, लांडी, दाबेजी, पिपरी.

या तालुक्याचे दहा टप्पे आहेत ते:—मलीर, ड्रिगरोड, कांकर, मोहिदान, गदाप, मंघोपीर, गालोपेट. दरसानोछन्नो, सोंघल व लांडी.

प्रत्येक टप्प्यावर टप्पेदार नांवाचा अधिकारी असून या तालुक्याचा मुख्य अधिकारी मुखत्यारकार आहे.

शहरें—मुख्य शहर कराची–( लोकसंख्या २१६८८३ ) या शहरीं मुखत्यारकार, कराची जिल्ह्याचे कलेक्टर व सिंधप्रांताचे अधिकारी कमिशनर हे राहत असून त्यांच्या कचेऱ्याही येथेंच आहेत. हे सिंधमधील पहिलें व मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या नंबरचें बंदर आहे. बंदर असल्यामुळें येथें व्यापार फार चालतो. त्यामुळें व्यापारी कंपन्यांचीं ऑफिसें. येथें बरींच आहेत. या शहरीं सरकारी बाग, व्हिक्टोरिया म्युझियम ( पदार्थसंग्रहालय ) फ्रियर हॉल जवळील एडवर्ड बादशहा व महाराणी व्हिक्टोरिया यांचे पुतळे, हवाबंदर हीं स्थळें पाहाण्यासारखीं आहेत.

मलीर—हें कराचीच्या पूर्वेस १४ मैलांवर असून फळफळावळें व भाजीपाला याविषयीं प्रसिद्ध आहे. या गांवाजवळच मोठमोठ्या विहिरी खणून त्याचें पाणी नळानें कराची शहरांत आणलें आहे.

मंघोपीर—हें कराचीपासून अकरा मैलांवर असून तेथें उन्हाळीं आहेत. रक्तपिती भरलेल्या लोकांना येथें औषधोपचार केला जातो. येथें पुष्कळ मगरी असून मुसलमानांचे पीरही पुष्कळ आहेत. म्हणूनच याला मगरपीर अथवा मंघोपीर म्हणतात.

महारीपूर—येथें मीठ तयार करतात.

लांडी—येथें सरकारी शेत असून तें नमुनेदार आहे.

८८०८

डिगरोड-हें रेल्वेस्टेशन असून विमानें उतरण्याचें ठिकाण आहे.

मनोरा—हें कराचीजवळ एक बेट असून तेथें दीपगृह आहे. शिवाय सरकारी तोफखाना आहे.

---

## ठट्टा तालुका.

सीमा-उत्तरेस कोट्री तालुका, कोहिस्तान महाल, पूर्वेस सिंधूनदी व कोट्री तालुका; दक्षिणेस मिरपूर साक्रा तालुका व घोडाबारी तालुका आणि पश्चिमेस कराची तालुका व कोहिस्तान महाल.

लोकसंख्या--३९४१०.

या तालुक्यांत तांबडे तांदूळ फार पिकतात.

आयात माल—साखर, विलायती कापड. हस्तिदंत, कांचेचें सामान, मोत्यें, रेशीम, वगैरे.

निर्यात माल—तांबडे तांदूळ, बाजरी ज्वारी, मूग, उडीद, मटर, तूप, लांकडे, कोळसा, रेशमी लुंग्या, रंगीत चादरी.

टप्पे—याचे सात टप्पे आहेत. तेः—

सोंडा, खडाई, चिलिया, खखरहाला, जुंगशाही, ठट्टा व टांका.

कालवे—भगार व कलरी हे कालवे यांत आहेत.

शहरें—मुख्य शहर ठट्टा-हें फार जुनें शहर आहे. येथें मुखत्यारकार कचेरी, पोस्ट ऑफिस तार ऑफिस सिंधी व गुजराथी शाळा आणि एक संस्कृत पाठशाळा आहे. ठट्टा शहराच्या पश्चिमेस मकली नांवाची टेकडी असून त्या टेकडीवर पिरांचीं कबरस्थानें आहेत. त्याला मिर्झाहशाहची रांग असें म्हणतात. यांतील कांहीं कांहीं कबरस्थानांचें नकशी काम फार उत्तम आहे.

या ठिकाणीं न्यायाधिशाची कचेरी व युरोपियन लोकांचे बंगले आहेत. ठठ्ठयापासून-झिरक, मिरपूरसाक्रा, केटीबंदर आणि कराची

या बाजूस सडका गेल्या आहेत. ठठ्ठा शहराजवळ कलाकोट नांवाच्या एका फार जुन्या शहराचा कांहीं अवशेष आहे. येथें जुम्मामशीद आहे. कलाकोट नांवाचें सरोवर येथून जवळ आहे. सोंढा व हेलायू हीं प्रसिद्ध गांवें आहेत.

---

## मिरपूरसाक्रा तालुका.

सीमा—उत्तरेस कराची तालुका, पूर्वेस ठठ्ठा तालुका, दाक्षिणेस घोडाबारी तालुका व पश्चिमेस अरबी समुद्र.

लोकसंख्या—२६५४९.

पिकें—ऊंस, केळीं, तांबडे तांदूळ हीं होत.

कालवे—भगार व कलरी हे मुख्य होत.

टप्पे—त्याचे दहा टप्पे केले आहेत. ते:—

मिरपूरसाक्रा, रामदेव, घारो, हाजी घराणो, गजोबोहारा, सखपूर, खेरपूर, गुलामला व करमपूर.

शहरें—मुख्यशहर-मिरपूरसाक्रा—येथें मुखत्यारकाराची कचेरी पोस्ट ऑफीस, पोलिसठाणें, सिंधी शाळा वगैरे आहे.

भंबोर—हें दाबेजी स्टेशनापासून सहा मैलांवर फार जुनें गांव आहे. यास पूर्वीं देवळबंदर म्हणत. महंमद बिन कासिमानें सिंधवरील स्वारीच्या वेळीं यास वेढा दिला होता. हें प्रसिद्ध मुसलमान साधु कबीर याचें राहाण्याचें ठिकाण होतें.

घारो—हें दाबेजीपासून ७ मैलांवर प्रसिद्ध गांव आहे.

ककराड—येथें सतरंज्या चांगल्या बनतात.

वटेजी—येथें एक पाहाण्यासारखा बाग आहे. शिवाय लष्करी ठाणें आहे.

बोहारो, गजो, बाबडा आणि गुलामला हीं इतर गांवें असून चटया, पंखे हीं याठिकाणीं चांगलीं तयार होतात.

---

## घोडाबारी तालुका.

सीमा—उत्तरेस ठट्टा व मिरपूरसाक्रा तालुके. दक्षिणेस व पश्चिमेस अरबी समुद्र. पूर्वेस सुजावळ तालुका.

लोकसंख्या—३६२३१

कालवे—नशीरवाह, गोछतो, हेदरी व सियाण हे कालवे आहेत.

टप्पे—या तालुक्याचे दहा टप्पे केलेले आहेत. तेः—गलील, खाण, कोट्रीअलारख्या, महर, गारहो, मुनारा, केटीबंदर, घोडाबारी, खिरसर, बेली.

शहरें—मुख्य शहर–कोट्रीअलारख्या–या ठिकाणीं मुखत्यार-काराची कचेरी, पोस्ट ऑफिस आहे.

पीरपट्टो—येथें दरवर्षी मुसलमान लोकांचा मेळा भरतो.

वर—येथें ऊसाची लागवड बरीच होते.

---

## केटीबंदर महाल

सीमा—उत्तरेस घोडाबारी तालुका, पूर्वेस सिंधूनदी, दक्षिणेस व पश्चिमेस अरबी समुद्र.

शहरें—मुख्य शहर–केटीबंदर–हें सिंधमधील दुसऱ्या नंबरचें बंदर आहे. येथें महालकरी राहातो.

खलिफा—येथें गवताचा मोठा व्यापार चालतो.

या महालांत सियाण, ओछतो व कलंदरी हे कालवे आहेत.

# कोट्री तालुका

**सीमा**—उत्तरेस माझांद महाल, पूर्वेस सिंधूनदी, दक्षिणेस ठट्टा तालुका व पश्चिमेस कोहिस्तानमहाल.

**लोकसंख्या**—३३२२४.

**कालवे**—सदाबहार, वगदाद सापावाह हे तीन कालवे आहेत.

**टप्पे**—यांत एकंदर सात टप्पे आहेत. ते:—

टंडाहाफजशहा, झिरक, वादा, खासाई, बंधवेराह, मेटिंग आणि वेह.

**शहरें**—मुख्यशहर—**कोट्री**—हें सिंधूनदीच्या कांठीं असून आगगाडीचें जंक्शन आहे. येथून आगगाडीचा एक रस्ता हैदराबादकडे व दुसरा रुक जंक्शनकडे जातो. या शहराजवळ सिंधूनदीवर एक फार मोठा लोखंडी पूल बांधून रेल्वेचा रस्ता नेला आहे.

या शहरापासून माझांद, सेवान, गणा बुलाखान, झिरक, ठट्टा, मलीर, कराची वगैरे शहरांकडे सडका गेल्या आहेत. तेथें दारू बनविण्याची एक भट्टी आहे. या तालुक्याचा मुखत्यारकार येथेंच राहातो.

**झिरक**—हे सिंधू नदीच्या कांठीं असून येथें एक सुंदर बाग व सरकारी हॉस्पिटल ( दवाखाना ) आहे. हें शहर एका टेकडीवर असल्यामुळें येथील हवा चांगली असते, म्हणून श्रीमंत लोक उन्हाळ्याचे दिवसांत येथें राहातात.

**भेयन**—हें कोट्रीपासून २३ मैलांवर प्रसिद्ध गांव आहे.

**उन्नडपुर**—हें सिंधू नदीच्या कांठीं असून रेल्वेचें स्टेशन आहे. येथें पूर्वी सिंधचा अधिकारी व अकबर बादशहा या दोघांत लढाई होऊन तींत अकबराचा जय झाला.

**बुढापूर**—हें एक प्रसिद्ध गांव आहे.

---

# माझांद महाल.

**सीमा**——उत्तरेस–सिंधूनदी, सेवान तालुका, पूर्वेस–सिंधूनदी, दक्षिणेस–कोट्री तालुका. पश्चिमेस–लकीचे डोंगर, कोहिस्तान महाल व सेवान तालुका.

**टप्पे**——पांच आहेत. तेः–माझांद, गाइंचा, काछी, सन व लकी.

**कालवे**——कारू, शहापंजु, नवरपूर, बट्ट.

यांतील कालवे अगदीं लहान आहेत त्यामुळें त्यांना पाट म्हटल्यास चालूं शकेल.

**लोकसंख्या**—१७४९५

**मुख्यशहर**——माझांद–येथें महालकरी राहातो. शिवाय पोस्ट ऑफिस, शाळा वगैरे आहेत. हें एक आगगाडीचें स्टेशन आहे.

**आमरी**--हें माझांदच्या उत्तरेस २० मैलांवर सिंधूनदीच्या कांठीं आहे,

**लकी**--हें सिंधूनदीच्या पश्चिम किनाऱ्यावर एक आगगाडीचें स्टेशन आहे. येथें उन्हाळीं आहेत.

**धारातीर्थ**—हें लकीपासून दोन मैलांवर आहे. येथेंही पण उन्हाळें असून दरवर्षी महाशिवरात्रीस मोठा मेळा भरतो.

**सन**--हें माझांदपासून ११ मैलांवर सिंधूनदीच्या कांठीं एक आगगाडीचें स्टेशन आहे.

---

# कोहिस्तान महाल.

कोहि ह्मणजे डोंगर आणि स्थान ( स्तान हा अपभ्रंश ) ह्मणजे ठिकाण. यांतील प्रदेश डोंगराळ असल्यामुळें याला कोहिस्तान म्हणतात.

**सीमा**--उत्तरेस सेवान तालुका, पूर्वेस कोट्री, माझांद व ठठ्ठा हे तालुके, दक्षिणेस ठठ्ठा व कराची हे तालुके आणि पश्चिमेस खिरथर उर्फ हालापर्वत व कराची तालुका.

**लोकसंख्या**--८६८१

या महालांत बलुची लोकांची वस्ती फार आहे. याचे दोन टप्पे आहेत. तेः--कर्चाट व मूल.

**मुख्य शहर**--ठाणाबुलाखान--येथें महालकऱ्याची कचेरी असून पोलिसठाणें, दवाखाना व शाळा आहेत. येथें सतरंज्या चांगल्या होतात. ठाणाअरबखान, झंगडी, तोंग व कर्चाट हीं यांतील इतर प्रसिद्ध गांवें होत.

---

## मिरपूर भटोरा तालुका.

**सीमा**--उत्तरेस सिंधूनदी; पूर्वेस गुनी तालुका; दक्षिणेस जाती व सुजावल हे तालुके; आणि पश्चिमेस सुजावल तालुका व सिंधू नदी.

**लोकसंख्या**--३६३६९.

**कालवे**--पिंजारी, गंजबहार, फत्तेवाह व महमुदोवाह असे चार कालवे या तालुक्यांत आहेत.

**टप्पे**--या तालुक्याचे बारा टप्पे केले आहेत. तेः--आटलशाह बनू, लायकपूर, मंगिलधोगोगो, दरो, अरारो, मिरपूरभटोरा, जहोक, जुणेजाणी, ढामरी, आमरा व मोजरी.

**मुख्य शहर**--मिरपूर भटोरा हें फत्तेवाहच्या कांठीं बेला व टन्डामहंमदखान यांच्यामधून जाणाऱ्या रस्त्यावर आहे. येथें मुखत्यारकाराची कचेरी, न्यायाधिशाची कचेरी (कोर्ट) हॉस्पिटल, पोलिसांचें ठाणें वगैरे आहेत. येथें सतरंज्या चांगल्या तयार होतात.

जहोक—येथें दरवर्षीं सफर (मुसलमानांचा महिना ) महिन्यांत शहा अनायत अल्ली सुफी याचा मेळा भरतो.

लायकपूर, बनू व दरो हीं गांवें पिंजारीवाहच्या कांठीं आहेत.

---

## सुजावल तालुका.

सीमाः—उत्तरेस मिरपूरभटोरा तालुका व सिंधू नदी; पूर्वेस मिरपूर भटोरा तालुका; दक्षिणेस जाती तालुका आणि पश्चिमेस सिंधू नदी.

लोकसंख्या—३२०६२

कालवे—या तालुक्यांत महंमुदोवाह व पिंजारी हे कालवे आहेत

मुख्य शहर—सुजावल येथें मुखत्यारकाराची कचेरी व पोलिसांचें ठाणें असून एक धर्मशाळा आहे.

याशिवाय कोट आलमन, बेलो, सुखपूर वगैरे प्रसिद्ध गांवें आहेत.

---

## जाती तालुका.

सीमा—उत्तरेस सुजावल, मिरपूरभटोरा व गुनी हे तालुके; पूर्वेस बदीन तालुका व कच्छचें रण; दक्षिणेस अरबी समुद्र, आणि पश्चिमेस शहाबंदर तालुका व सिंधू नदी.

लोकसंख्या—३१८४६

कालवे—मिरझावाह, गुंगडो, गदाब, शेहरखान व सयद हे कालवे आहेत.

टप्पे—या तालुक्याचें बारा टप्पे केले आहेत. तेः—शाहकपूर, ररी, मुलान, हासाणी, मरहो बुलाखान, मुगलभीम, कोठी, दोजो, शेरगंढो, राजमलक, मनारकी व बहादीपूर.

मुख्य शहर–मुगलभीम हें गुंगडो कालव्याच्या कांठीं आहे. येथें मुखत्यारकाराची कचेरी आहे. येथें दरवर्षी फाल्गुन महिन्यामध्यें शहा मुगलभीमचा मोठा मेळा भरतो. मुगल व भीम नांवांच्या बापलेकांच्या मरणानंतर त्यांच्या स्मरणाकरितां या शहरास हें नांव दिलें आहे असें म्हणतात.

जाती–येथें पोलिसांचें ठाणें, पोस्ट ऑफिस. शाळा वगैरे आहेत. येथें लोंकरीच्या धाबळ्या चांगल्या होतात.

शाहकपूर–येथें दरवर्षी अमीर पिराचा मेळा भरतो.

शेरगंढो–येथून तांबडे तांदूळ बरेच रवाना होतात. हें मिठाकारितां प्रसिद्ध आहे.

---

## शहाबंदर तालुका.

सीमा––उत्तरेस सिंधूनदी व जाती तालुका; पूर्वेस जाती तालुका; दक्षिणेस अरबी समुद्र व पश्चिमेस सिंधूनदी.

लोकसंख्या—३४६०७.

कालवे––मल्ह व मुटनीचे कांहीं फाटे हे कालवे या तालुक्यांत आहेत.

टप्पे––या तालुक्यांचे तेरा टप्पे केले आहेत. ते:–छछजानखान, बाबिहो, जिअंदजन गियजो, शहाबंदर, क्यालिकोट, नंढ, जोशीवारी, गुंगाणी, मगसी, लाडयू, चुहर जमाली, लखी व जोंगोजलबाणी.

मुख्य शहर––लाडयू येथें मुखत्यारकाराची कचेरी व पोलिसांचें ठाणें आहे.

शहायकीक—या गांवीं दरवर्षी शहायकीक याचा मेळा भरतो.

चहुरजमाली––हें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे.

---

# भाग तिसरा.

## जिल्ह्याची राज्यव्यवस्था.

जिल्ह्यावरील मुख्य अधिकाऱ्यास कलेक्टर म्हणतात. त्याची कचेरी जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं असते. जमिनीचा सारा व इतर कर वसूल करणें हें कलेक्टरचें मुख्य काम आहे. याशिवाय त्यास जिल्ह्यांत कोठें गडबड अथवा दंगा झाल्यास तो मोडणें व बऱ्याच मोठ्या फौजदारी खटल्यांची चौकशी करणें वगैरे कामेंही करावीं लागतात. कलेक्टरांस मदत करण्याकरितां त्याच्या हाताखालीं असिस्टंट कलेक्टर व डेप्युटी कलेक्टर हे कामगार असतात.

खून, दरोडे वगैरे सारख्या फार मोठ्या गुन्ह्यांची चौकशी करण्याकरितां प्रत्येक जिल्ह्यांत सेशन जज्ज नांवाचा एक अधिकारी असतो. तो कलेक्टरच्या हाताखालीं नसून स्वतंत्र असतो.

जिल्ह्यांतील आरोग्याची व्यवस्था ठेवण्याकरितां एक अधिकारी नेमिलेला असतो, त्यास सिव्हिल सर्जन म्हणतात. जिल्ह्यांतील सरकारी इस्पितळें व दवाखाने यांवर देखरेख करणें हें काम त्यास करावे लागतें.

जिल्ह्यांतील रस्ते, कालवे, सरकारी इमारती वगैरे दुरुस्त करणें किंवा नवीन बांधणें हें काम करण्याकरितां एक अधिकारी नेमलेला असतो त्यास एंजिनिअर म्हणतात.

जिल्ह्यांतील शाळा खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणतात. जिल्ह्यांतील सर्व शाळांवर देखरेख करणें हें त्याचें काम असतें.

# भूगोल विषयक उपयुक्त व्याख्या.

**गांव**—पुष्कळ लोक एका ठिकाणीं घरें बांधून राहिलेले असतात त्यास गांव म्हणतात.

**शहर**—गांव फार मोठा असल्यास त्यास शहर म्हणतात.

**तालुका**—कांहीं गांवें मिळून जो एक भाग मामलेदाराच्या ताब्यांत दिलेला असतो त्यास तालुका म्हणतात.

**जिल्हा**—कांहीं तालुके मिळून जो एक भाग कलेक्टरच्या ताब्यांत दिलेला असतो, त्यास जिल्हा म्हणतात.

**बेट**—चोहोंकडे पाणी असून मध्यें जी जमीन असते तीस बेट म्हणतात.

**तळें व सरोवर**—चोहोंबाजूंस जमीन असून मध्यें जो पाण्याचा सांठा असतो त्यास तळें म्हणतात व तळें फारच मोठें असल्यास त्यास सरोवर म्हणतात.

**भूशिर**—जमिनीचें जें अरुंद टोंक पाण्यांत गेलेलें असतें त्यास भूशिर म्हणतात.

**आखात व उपसागर**—पाण्याचा अरुंद फाटा जमिनींत गेलेला असतो त्यास आखात म्हणतात. आखात रुंद असून फार मोठें असल्यास त्यास उपसागर म्हणतात.

**द्वीपकल्प**—ज्या प्रदेशाच्या तिहींकडून पाणी असून ज्याची चौथी बाजू जमिनीशीं जोडलेली असते त्यास द्वीपकल्प म्हणतात.

**खाडी**—समुद्राच्या भरतीचें पाणी नदीच्या मुखांत शिरून तें रुंद झालेलें असतें, त्यास खाडी म्हणतात.

**सामुद्रधुनी**—दोन समुद्रास जोडणारी जी रुंद व खोल खाडी असते, तिला सामुद्रधुनी म्हणतात.

टेकडी—जमिनीवरील मोठ्या उंचवट्यास टेकडी म्हणतात.

डोंगर—टेकडी फार मोठी असल्यास तिला डोंगर म्हणतात.

पर्वत—डोंगर अतिशय मोठा व उंच असल्यास त्यास पर्वत म्हणतात.

खोरें—डोंगरांच्या दोन रांगांमध्यें जो खोलगट प्रदेश असतो यास खोरें म्हणतात.

दरा—दोन डोंगरांमधील लहान व चिंचोळ्या भागास दरा म्हणतात.

---

3234

# प्रश्नसमुदाय.

१ तालुका व जिल्हा यांवरील मुख्य अधिकारी कोण व त्यांचीं मुख्य कामें कोणतीं ?

२ बेट व भूशिर यांच्या उलट काय ? यांच्या व्याख्या लिहा.

३ कराची जिल्ह्यांत कारागिरीचीं काय काय कामें होतात व त्याविषयीं कोणतें ठिकाण प्रसिद्ध आहे ?

४ भूशिर, बेट, आखात, सामुद्रधुनी व सरोवर यांच्या व्याख्या लिहा.

५ कराची तालुक्यांतील आगगाडीचीं स्टेशनें लिहा.

६ कराची जिल्ह्यांत कोणकोणत्या साधनांनीं दळणवळण चालतें?

७ या जिल्ह्यांतील बंदरें लिहा.

८ सिव्हिल सर्जन व डेप्युटी इन्स्पेक्टर यांच्याकडे कोणतीं कामें असतात ?

९ धारातीर्थ, शहाबंदर, मकली, मनोरा, लियारी, हवाबंदर व मुगलभीम हीं कोठें आहेत व त्यांच्याविषयीं तुम्हांला काय माहिती आहे ?

१० कराची जिल्ह्यांतील आयात व निर्यात माल लिहा.

११ तांबडे तांदूळ कोठें पिकतात ?

१२ कराची जिल्ह्यांत कालवे जास्त असण्याचीं कारणें लिहा.

१३ या जिल्ह्यांतील कालवे सांगा.

१५ सिंधू नदीच्या कांठीं मोठमोठीं शहरें असून लोकवस्ती दाट आहे व शहाबंदर तालुक्यांत लोकवस्ती अगदीं पातळ आहे याचें कारण काय ?

ाख्याच्या नकाशावर कराची व मुंबई यांमधील
ाची लांबी नऊ इंच आहे व त्या नकाशाचें स्केल
मैल आहे, तर कराचीपासून मुंबई किती मैल

१७ कोणत्याही दोन स्थळांमधील नकाशावरील अंतर व त्याचा
न स्थळांमधील खरें अंतर हीं दिलीं असतां त्या नकाशाचें स्केल
कसें काढावें ?

—समाप्त—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3.234

REFBK-0003235
REFBK-0003235